**रे. दिवाणी मुकदमा क्र.२७८/२०१५ निशाणी १३९ वरील आदेश**
**( शिला पाटील वगैरे विरुध्द संपत पाटील वगैरे )**
**CNR NO.MHSN050015592015**

१. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला 'पुरावा बंद' चा आदेश रद्दबातल होवून सरतपासाचे प्रतिज्ञापत्र देण्यास परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेली कैफियत स्वीकारली आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांना पुरावा देण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब त्यांनी जाणूनबूजून केलेला नाही. त्यांचा पुरावा अभिलेखावर आल्यास वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नसून सत्य असत्याचा बोध होणार आहे. त्यामुळे दाव्याच्या न्यायदानास मदत होणार आहे. करीता प्रस्तुत प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला पुरावा नाही असा आदेश रद्द होवून त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास ठाम विरोध दर्शविला. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादी हे प्रकरण लांबविण्याकरीता मुद्दामहून प्रस्तुतचा अर्ज देत आहेत. त्यांना प्रस्तुत दाव्याची पूर्वीपासून माहीती होती. परंतु ते मुद्दामहुन मे. कोर्टात हजर राहत नव्हते. करीता प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, यदाकदाचित अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत न्यायालय आल्यास प्रतिवादी यांच्यावर २०००/– रुपये खर्च बसविण्यात यावा.

४. सदर अर्जास अनुसरुन प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुत दावा घोषणा व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी यांना वेळोवेळी पुराव्याची संधी देवूनही त्यांनी पुरावा दिला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द पुरावा बंद असा आदेश पारीत केलेला आहे. सदर प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्याकरीता नेमण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेली कैफियत

स्वीकारली असल्यामुळे व त्यांना कायदेशीर ज्ञान मिळाले नसल्यामुळे त्यांना पुरावा देणे शक्य झाले नाही. करीता त्यांचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात दिनांक १६.१०.२०२३ रोजी मुद्दे निश्चित केले. तेव्हापासून दावा पुराव्यासाठी प्रलंबित आहे. परंतु प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी पुरावा का दिला नाही याचे संयुक्तीक कारण दिलेले नाही. असे असले तरी त्यांना पुरावा दाखल करण्याची संधी देणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र.३ व ४ यांना पुरावा दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांना त्यांचा पुरावा देण्यापासून व त्यांची बाजु मांडण्यापासून प्रतिरोधीत केल्यासारखे होईल, तसेच त्यामुळे कार्यवाहीचे बाहुल्य होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता प्रस्तुत प्रकरणाचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता प्रस्तुत प्रतिवादी यांना पुराव्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. झालेला विलंब लक्षात घेता प्रस्तुत प्रतिवादी यांच्यावर खर्च लावून त्यांना पुरावा दाखल करण्याची संधी दिल्यास त्यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. वरील सर्व बाबीचा सारासार विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.३ व ४ यांचा नि.क्र.१३९ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांचेविरुध्द दिनांक १४.०२.२०२४ रोजी झालेला 'पुरावा बंद' आदेश रक्कम रुपये १५००/– खर्च वादींना देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.३ व ४ पुढील तारखेपर्यंत वरीलप्रमाणे पुर्तता केल्यानंतर त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2024.10.05 11:33:38 +0530

**इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक– २६.०९.२०२४** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इस्लामपूर.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **२६.०९.२०२४** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **०४.१०.२०२४** |